दैनिक

www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ३२ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.२६ नोव्हेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

## लाडक्या बहिणींनी वर्षा निवासस्थानी एकनाथ शिंदेंचे केले औक्षण

# लाडक्या बहिणींनी एवढा मोठा चमत्कार केला, आश्वासन पूर्ण करणार-एकनाथ शिंदे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–एकनाथ शिंदे यांचे औक्षण करण्यासाठी लाडक्या बहिणी मोठ्या संख्येने वर्षा निवासस्थानी पोहोचल्या. यावेळी लाडक्या बहिणींनी एकनाथ शिंदे यांचे औक्षण केले. तसेच, त्यांचे अभिनंदनही केले. तसेच, यावेळी लाडक्या भावाचा विजय असो, अशी घोषणाबाजीही लाडक्या बहिणींकडून करण्यात आली. त्यासोबतच एकनाथ शिंदे यांनी लाडक्या बहिणींचे आभार मानले असून दिलेले आश्वासन पूर्ण करणार असल्याचाही शब्द लाडक्या बहिणींना दिला आहे. यावेळी निलम गोऱ्हे यांनी पुढचे पाच वर्ष एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री झाले पाहिजेत, अशी इच्छा व्यक्त केली.



### मुख्यमंत्री बहीण लाडकी, विरोधकांच्या छातीत भरली धडकी

आक्रमक बाणा पण तेवढाच जिव्हाळा असलेले अनिल दादा शिंदे म्हणाले– लाडक्या बहिणींचे मी स्वागत करतो. त्यांनी खूप चांगला प्रतिसाद दिला. त्याबद्दल त्यांचे खूप खूप अभिनंदन. लाडक्या बहिणींनी या राज्यात इतिहास घडवला आहे. महायुतीने विकासाचं, कल्याणकारी योजनाचं काम केलं. त्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही सर्वात सुपरहीट झाल्याचेही ते म्हणाले. माझ्या लाडक्या बहिणींमुळे अद्भुत आणि दैदिप्यमान विजय आम्हाला मिळाला आहे. लाडक्या बहिणींनी विरोधकांकडे विरोधी पक्षनेतेपद सुद्धा शिल्लक ठेवलं नाही. राज्यात लाडक्या बहीणींची लाट निर्माण झाली आणि या लाटेत विरोधी पक्ष वाहून गेला. हा चमत्कार लाडक्या बहिणींनी केला. त्यामुळेच तुम्ही आज मला भेटायला, शुभेच्छा द्यायला आलात.

हा लाडका भाऊ कायम तुमच्या पाठीशी उभा असल्याचेही शिंदे म्हणाले. माझ्या लाडक्या बहिणींच्या परिवाराला काहीतरी हातभार लागला पाहिजे. म्हणूनच आम्ही ही योजना सुरू केली. तीन सिलेंडर मोफत देण्याचा निर्णयही आम्ही त्यासाठीच घेतला. म्हणून आपण म्हणतो की हे सरकार सर्वसामान्यांचं आहे, गरिबांचं आहे. काँग्रेस म्हणाले की, गरीबी हटावो, एकीकडे गरीब हटला पण गरिबी हटली नसल्याचा हल्लाबोलही शिंदेंनी काँग्रेसवर केला.तसेच, लाडकी बहीण योजनेचे दिलेले एकवीसशे रुपयाचे आश्वासनही पूर्ण करणार असल्याचा शब्द त्यांनी लाडक्या बहिणींना दिला. डम्पिंग मेजॉरिटी येईल असे मी सांगत होतो. पण तुम्ही लाडक्या बहिणींनी विरोधकांना डम्पिंगमध्ये टाकल्याचा टोलाही त्यांना विरोधकांना लगावला. तुम्ही आज मला धन्यवाद, औक्षण आणि शुभेच्छा द्यायला आलात त्याबद्दल मी तुमचा खूप खूप आभारी आहे.

## तांदूळ माफियांना आवर कोण घालणार?

**पाटणबोरी | प्रतिनिधी**

तेलंगणातील आदिलाबाद येथून दररोज तांदूळ तस्करी होऊन पाटणबोरी व पांढरकवडा येथे तीन चाकी वाहनांद्वारे मोठ्या प्रमाणात आणला जातो. या तांदळाची नंतर आयचर वाहनांमध्ये लोड करून नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, वरोरा आणि इतर भागांत पाठवणी केली जाते. तेलंगणामधील १ रुपया किलोचा तांदूळ पाटणबोरी येथे तब्बल ३० ते ३५ रुपये किलोने विकला जात असल्याचे उघड झाले आहे.

या तांदूळ तस्करीचे जाळे पांढरकवडा पोलीस स्टेशन हद्दीत सक्रिय असून, यापूर्वीही या प्रकारावर तक्रारी दाखल झाल्या होत्या. दोन वर्षांपूर्वी सरकारी गोदामातील तांदळाचा साठा जप्त करण्यात आला होता. मात्र, अद्यापही तांदूळ तस्करी सुरु असून स्थानिक प्रशासन, पोलीस आणि अन्न व पुरवठा विभाग याकडे दुर्लक्ष करत आहेत, असा आरोप नागरिक करत आहेत.

**ताबडतोब जिल्हा पुरवठा अधिकारी आणि केळापूर तहसीलदार यांनी यावर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. गरीब कुटुंबीयांचा हक्क हिरावून घेणाऱ्या या तांदूळ माफियांवर कठोर कारवाई झाली नाही, तर याचा तीव्र निषेध होईल, असे नागरिकांनी स्पष्ट केले आहे.**



**“ तांदळाने भरलेली वाहने पकडल्यास, काही अन्न व पुरवठा अधिकारी मुद्दाम साधा अहवाल तयार करून तो तांदूळ शेतकऱ्यांचा असल्याचे दाखवतात, असे बोलले जात आहे. यामुळे गरीब लाभार्थ्यांचा हक्काचा तांदूळ बाजारात विकला जातो आणि माफियांचे फावते.**

**“ या अवैध तस्करीत 'वितरण सेठ उर्फ तांदूळ माफिया' असे नाव घेण्यात येत असून, मागील दोन-तीन वर्षांपासून तो कोणतीही भीती न बाळगता राजरोसपणे हा व्यवसाय चालवतो आहे. या प्रकरणात पुरवठा विभाग, पोलीस विभाग आणि स्थानिक राजकारण्यांची संशयित भूमिका असल्याचे बोलले जात आहे.**

## महायुतीच्या सत्ता स्थापनेचा दिवस लांबला

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर, महाराष्ट्रातील मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाच्या शपथविधीचा मुहूर्त २६ नोव्हेंबरला ठरला होता. तथापि, सत्तास्थापनेचा दिवस आता लांबणीवर पडला असल्याची माहिती मिळाली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, पूर्ण बहुमताच्या सरकारामुळे कोणतीही घाई न करता व्यवस्थित निर्णय घेऊनच सरकार स्थापन करण्याची योजना आहे. मुख्यमंत्रीपदाचा चेहरा निवडण्यासाठी भाजपच्या संसदीय बोर्डाची बैठक होणे आवश्यक आहे. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यात बैठक होईल. या बैठकीनंतरच या तिघा नेत्यांचा शपथविधी होईल. अशा स्थितीत २७ किंवा २९ नोव्हेंबरला सत्तास्थापन होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



## चंद्रपुरात देशी कट्ट्यासह आरोपी अटकेत;स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे शाखेने सोमवारी गस्त घालत असताना देशी कट्ट्यासह एका आरोपीस अटक केली आहे. आरोपीचे नाव नरेश भीक्षपति तूरपाटी (वय २५), मुळ तेलंगणा, सध्या रा. हल्ली मु. नरेंद्र नगर, जैन लेआऊट बायपास रोड चंद्रपूर असे आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रामनगर पोलीस स्टेशन हद्दीत गस्त घालत असताना स्थानिक गुन्हे शाखेला गोपनीय माहिती मिळाली की, आरोपी नरेश तूरपाटी याच्याकडे देशी कट्टा आहे. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी त्याच्या घरावर छापा मारला. घराची झडती घेतल्यावर एक बनावटी देशी कट्टा जप्त करण्यात आला.

देशी कट्टा जप्त केल्यानंतर आरोपीस ताब्यात घेतले आणि त्याच्यावर भारतीय हत्यार कायद्यानुसार रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून अटक केली. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मधुकर सामलवार, पो.हवा दीपक डोंगरे, ना.पो.का. संतोष येलपुलवार, पोका. गोपाल आतकुलवार, गोपीनाथ नरोटे यांचा सहभाग होता.



## गोळवाडी शाळेचे गेट बंद असल्यामुळे अंगणवाडी शिक्षिका व ग्रामस्थांना होतो आहे त्रास

**वैजापूर | प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यातील गोळवाडी गावातील जिल्हा परिषद शाळेचे गेट बंद ठेवले जात असल्यामुळे अंगणवाडी शिक्षिका आणि विद्यार्थ्यांना शाळेच्या बाहेरच थांबावे लागत आहे. गोळवाडी गावात जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाडी एकाच ठिकाणी असून त्यांचा एकच प्रवेशद्वार आहे. मात्र, अंगणवाडी शिक्षिका व विद्यार्थ्यांना शाळेचे गेट उघडण्याची प्रतीक्षा करावी लागते.


अंगणवाडी शिक्षिका वाकचौरे यांनी एक महिन्यापूर्वी शालेच्या गेटची चावी मुख्याध्यापिका डिके यांचे कडून मागितली होती. परंतु, चावी न दिल्यामुळे शिक्षिका आणि विद्यार्थ्यांना शाळेच्या गेटच्या बाहेरच तासंतास थांबावे लागते. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनील पगार यांनाही याबाबत सांगितले होते, परंतु त्यांनाही चावी मुख्याध्यापिका शशिकला डिके यांच्याकडे असल्याचे सांगितले.



अंगणवाडी सकाळी ८:३० वाजता सुरू होते, तर जिल्हा परिषद शाळा ९:३० वाजता सुरू होते. त्यामुळे शिक्षिका आणि मुलांना शाळेचे गेट उघडण्याची प्रतीक्षा करावी लागते. शिक्षिका व मुलांचे हेच मागणे आहे की, त्यांना देखील गेटची चावी दिली जावी.

याशिवाय, शाळेच्या कंपाऊंडमध्ये एक सार्वजनिक हातपंप आहे. गावातील अनेक ग्रामस्थ पाणी भरण्यासाठी या पंपाचा वापर करतात, परंतु शाळेचे गेट बंद असल्यामुळे त्यांना पंपावर पाणी आणता येत नाही. गावात एक पाण्याची टाकी असली तरी ती गावाच्या एका टोकावर आहे, ज्यामुळे काही आदिवासी समाजाच्या लोकांना पाणी आणण्यासाठी दूर जावे लागते. शाळेच्या कंपाऊंडमधील हातपंप अधिक जवळ असल्यामुळे ग्रामस्थांची मागणी आहे की शाळेचे गेट उघडे ठेवावे, त्यामुळे त्यांना पाणी भरता येईल.

## आठ महिन्यांच्या वाघाचा मृतदेह आढळल्याने खळबळ



**चंद्रपूर | प्रतिनिधी**

मध्यचांदा वनविभागाचे चिवंडा वनपरिक्षेत्रात कक्ष क्र.१३८ मध्ये एका वाघिणीचा मृतदेह आढळल्याने खळबळ माजली आहे. मृत वाघ मादी असून तिचे वय सात ते आठ महिने असल्याचा अंदाज वनविभागाने वर्तविला आहे. मृत वाघिणीच्या शरीरावर ओरखडल्याचे निशाण आढळले असून तिचे सर्व अवयव शाबूत आहेत. वनविभागाने अंदाज व्यक्त केला आहे की, प्रौढ नर वाघाने लढाईत या सात ते आठ महिन्यांच्या वाघिणीला मारले असावे. पुढील तपास उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, सहाय्यक वनसंरक्षक शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरीक्षेत्र अधिकारी एस. व्ही. मुरकुटे करीत आहेत. शव विच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे खरे कारण स्पष्ट होईल.

### ठाकरे गटाचे पाच आमदार आमच्या संपर्कात

# दोन-तीन सोडता सर्व आमदार आमच्याकडेच येतील;उदय सामंत यांच्या वक्तव्याने चर्चांना उधाण

**मुंबई (वृत्तसंस्था)**–शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे पाच आमदार आमच्या संपर्कात आहेत. यावेळी दोन-तीन सोडता सर्व आमदार आमच्याकडेच येतील. रात्रीपासून हे आमदार आमच्या संपर्कात आहेत, असे शिवसेना नेते उदय सामंत यांनी म्हटले आहे.दरम्यान उदय सामंत पुढे बोलताना म्हणाले की, ठाकरेंचे काही आमदार आमच्यासंपर्कात् आहेत. त्यांच्याबद्दल एकनाथ शिंदे घेतील. ईव्हीएममध्ये गडबड असल्याचा आरोप आता समोरून केला जातोय. जो धनुष्यबाण दुसऱ्याच्या खांद्यावर होता तो आम्ही घेऊन आलोय. गद्दारी कोणी केली हे पुन्हा एकदा दाखवून दिले.उदय सामंत म्हणाले की, महायुतीचे कोकणमध्ये निवडून आलेले आमदार कोकणचा विकास करू याचा आम्हाला विश्वास आहे. तिथे उदय सामंत यांचे बंधू किरण सामंत हे देखील विजयी झाले आहेत. महाराष्ट्रात महायुतीची सत्ता येणारच होती हे मला माहित होते, असा विश्वास उदय सामंत यांनी व्यक्त केला आहे. साामंत म्हणाले की. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी केलेली विकासकामं जनतेने पाहिली आहेत. त्यामुळे जनतेचा कौल महायुतीला असल्याचे स्पष्ट झाले आहे.रत्नागिरी विधानसभा मतदार संघात १ लाख ११ हजार ३३५ मते मिळवून उदय रविंद्र सामंत हे विजयी झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी जीवन देसाई यांनी घोषित केले. बाळ माने यांना दुसऱ्या क्रमांकाची ६९ हजार ७४५ इतकी मते मिळाली.नारायण राणे यांचे दोन्ही सुपूत्र आमदार म्हणून निवडून आले आहेत. कोकणामध्ये घराण्यांची परंपरा मोठी राजकीय आहे. राणे, तटकरे आणि सामंत यांच्या विजयांच्या रूपाने आता ती अधिकच ठळक होण्यास मदत आहे. सर्वच ठिकाणी यंदा पैशाच्या वारेमाप वापराचा मुद्दा कळीचा राहिला. त्याचा लाभ बहुतांश ठिकाणी प्रस्थापितांना झाल्याचे पाहायला मिळते.



# कोपरगाव मतदारसंघात जपलेल्या महायुतीचा आदर्श कौतुकास्पद

**कोपरगाव । प्रतिनिधी**

कोपरगाव शहरात महायुतीचा महाविजय युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी,पेढे भरवत ढोल ताशाच्या गजरात घोषणांनी आनंदोत्सव साजरा केला.यावेळी बोलताना विवेकभैय्या कोल्हे यांनी भाजपा महायुतीचे ऐतिहासिक विजयाचे क्षण आनंद देणारे आहे.देशाचे नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी,गृहमंत्री अमित शाह,राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा,राज्यातील खंबीर नेतृत्व देवेंद्र फडणवीस,प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा हा करिष्मा आहे.कोल्हे कुटुंबाने घेतलेल्या भूमिकेमुळे मोठे मताधिक्य देऊन महायुतीचे उमेदवार आशुतोष काळे यांचा विजय घडवून आणण्यात सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले याचा अभिमान आहे .कोल्हे कुटुंबाने वरिष्ठ नेतृत्वाच्या भेटीनंतर कार्यकर्त्यांना केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन त्यांनी युतीधर्म सिद्ध केला.कोपरगाव मतदारसंघात ऐतिहासिक विजय मिळवला या युतीधर्माचा आदर्श राज्यभर घेतला जाईल असा विश्वास व्यक्त करत सर्व महायुतीचा उमेदवारांचे अभिनंदन केले आहे.यावेळी भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीतील गाफीलपणा विधानसभेच्यावेळी दुर करून अवघ्या तीन महिन्यांत मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना आणून ती तळागाळापर्यंत नेवन केंद्राची आर्थीक ताकद राज्यात उभी करायची असेल तर महायुतीशिवाय पर्याय नाही हा संदेश देत माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य पिंजुन काढत महायुतीच्या सर्वच उमेदवारांसाठी जीवाचे रान करून काम केले त्यामुळे कोपरगांव विधानसभा मतदार संघासह राज्यात पुन्हा महायुतीच सत्तेवर आली यात माजी मुख्यमंत्री देवाभाऊ किंगमेकर असुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्वच मित्र पक्षांचे सहकार्य मिळाले अशी प्रतिक्रिया माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी देत सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले. कोपरगांवात कोल्हेंनी महायुतीचा धर्म पाळुन वरिष्ठांना दिलेला शब्द खरा करून दाखविला असेही त्या प्रसिध्दी पत्रकाद्वारे म्हणाल्या.




स्नेहतलाताई कोल्हे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे प्रतिक्रिया देताना महाराष्ट्र राज्यात सर्वच जाती पंथाचे लोक गुण्या गोविंदाने राहतात, त्यांची सुख-दुःखे काय आहेत याचा प्रामाणिकपणे प्रतिशोध घेत भारतीय जनता पक्ष नेतृत्व, तसेच प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह सर्वच घटकांनी ते निवारण करण्याचे काम केले व माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अभिप्रेत असणारा महाराष्ट्र घडविण्यांसाठी कार्यकर्त्यांनी जीवाचे रान केले त्यामुळेच राज्यात तिस-यांदा महायुतीची सत्ता स्थापन झाली. महिला ही शक्ती आहे. बचतगटाच्या माध्यमांतुन त्यांना पाठबळ देत माता भगिनींसाठी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना भारतीय जनता पक्षांने आणली ते खरे या यशाचे मुख्य गणित आहे.कोपरगाव मतदारसंघांत मोठे काम भाजपाकडून करण्यात आले होते त्याचाही फायदा या निवडणुकीत झाला.स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी बारा बलूतेदारांना बरोबर घेत स्वराज्य उभारले त्याच विचारावर भारतीय जनता पक्ष व मित्र पक्षाने या विधानसभेच्या निवडणुकीत रणनिती आखून महायुतीच्या उमेदवारांच्या विजयासाठी चंग बांधला, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विकासाचा धडाका, केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शहा यांचा प्रचारादरम्यानचा मास्टरस्ट्रोक, विरोधकांच्या फेक नरेटिव्हला जशास तसे उत्तर आणि राज्य ते गांवपातळीपर्यंत केलेल्या विकासाची सुत्री मतदारांपर्यंत पोहोचविल्याने राज्यात तिस-यांदा सत्तेच्या चाव्या महायुतीकडे आल्या आहेत.

कोपरगांव विधानसभा निवडणुकीत येथील महायुतीचे उमेदवार आमदार आशुतोष काळे यांच्या विजयासाठी पक्ष नेतृत्वांशी युतीधर्माबाबत झालेल्या चर्चेप्रमाणे संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिनदादा कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली तंतोतंत पालन करत महायुती धर्म दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांत रूजविण्यांसाठी प्रामाणिक प्रयत्न केले त्यामुळेच त्यांचे मताधिक्य अपेक्षेप्रमाणे मिळाले आहे असेही सौ. स्नेहलता कोल्हे शेवटी म्हणाल्या.

## एस.एन.डी.टी महिला विद्यापीठात स्केचिंग अँड रेंडरिंग या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा:विद्यार्थिनींचा उत्स्फूर्तपणे सहभाग

**बल्लारपूर । प्रतिनिधी**

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई चे महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल, बल्लारपूर येथे १९ नोव्हेंबर २०२४ रोजी स्केचिंग अँड रेंडरिंग या विषयावर बी.ए. (फॅशन डिझाईन) आणि बी. वोक. (इंटरियर डिझाईन) विद्यार्थिनींसाठी एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. ह्या कार्यशाळेसाठी २२ वर्षे कला(फाईन आर्ट्स)विषयाचा अनुभव असलेले प्रा. स्वरुप रंगारी यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. रंगारी यांचे शिक्षण फाईन आर्ट्स मध्ये झाले असून ते सध्या द आदित्य बिर्ला पब्लिक स्कूल आवारपुर, जि. चंद्रपूर येथे कार्यरत आहे.

प्रा. रंगारी यांनी खूप सोप्या पद्धतीने स्टील लाईफ ड्रॉईंग, रेंडरिंग, कलरिंग, आणि परस्पेक्टिव्ह ड्रॉईंग बद्दल डेमो देखील दिला.




कार्यशाळेचे आयोजन सहा. प्रा. प्रणाली गौरकर यांनी केले.

एस. एन.डी. टी.महिला विद्यापीठ मुंबई, बल्लारपूर कॅम्पस चे संचालक डॉ. राजेश इंगोले यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भूषविले. त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थिनींना प्रोत्साहित करत आपल्या कलागुणांना वाव देण्याचे आव्हान केले. कार्यशाळेत विद्यापीठातील विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत, कार्यशाळेचा लाभ घेतला. कार्यक्रमाला एस. एन. डी. टी.महिला विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉक्टर बाळू राठोड आणि समन्वयक वेदानंद अलमस्त यांची विशेष उपस्थिती होती. तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहा. प्रा. शितल गडेकर यांनी केले.

## भद्रावती येथे वं.राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

**भद्रावती । प्रतिनिधी**

वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचा ५६ वा पुण्यतिथी महोत्सव दिनांक २९ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०२४ पर्यंत विविध कार्यक्रम व सामाजिक उपक्रमांनी लोकमान्य विद्यालय चे प्रांगणात संपन्न होत आहे.



दिनांक २९ नोव्हेंबर रोज शुक्रवारला सकाळी ५.३० वाजता शेषानंद पांडे महाराज यांचे हस्ते श्री गुरुदेव अधिष्ठानाचे पूजन व सामुदायिक ध्यानाने कार्यक्रमाची सुरुवात होईल यानंतर सायंकाळी ५.३० वाजता सामुदायिक प्रार्थना होईल याप्रसंगी प्रा.रूपलाल कावळे वरोरा यांचे मार्गदर्शन होणार असून रात्रौ ठीक ८.०० वाजता सप्तखंजरी वादक सत्यपाल महाराजांचे शिष्य रामपाल महाराज यांचा राष्ट्रीय किर्तनाचा कार्यक्रम होईल. दिनांक ३० नोव्हेंबर रोज शनिवारला सकाळी ९.०० वाजता गोपालजी कडू गुरुकुंज आश्रम यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांचा परिसंवाद स्पर्धा संपन्न होईल या स्पर्धेकरिता प्रमुख अतिथी म्हणून मनोज महाराज चौबे ,राज घुमनर उपस्थित राहतील. दुपारी ठीक १.०० वाजता महिला सम्मेलन बेबीताई काकडे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होणार असून याप्रसंगी निर्मलाताई खडतकर,कविता येनुरकर, निता कोतमवार,साक्षी पवार यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

यानंतर सामुदायिक प्रार्थना प्रसंगी अरविंदजी राठोड चिंतन प्रगट करतील. यानंतर सायंकाळी ७.०० वाजता राष्ट्रसंत व्याख्यानमाला त्यानंतर कर्करोग प्रतिबंध लक्षणे व उपचार यावर डॉक्टर प्रफुल खुजे यांचे मार्गदर्शन होईल व रात्रौ ८.०० वाजता स्वर गुरुकुंजाचे हा राष्ट्रसंतांच्या भजनावर आधारित कार्यक्रम संयोजक अमोल बांबल व मानव सेवा छात्रालय गुरुकुंज आश्रम मोझरी येथील विद्यार्थी सादर करतील. दिनांक १ डिसेंबर रोज रविवारला सकाळी ७.०० वाजता रामधून निघेल याप्रसंगी रवींद्रजी ढवळे यांचे मार्गदर्शन होईल,दुपारी १२.०० वाजता शिवचरित्रकार व प्रबोधनकार ह.भ.प.किशोर महाराज ठाकरे आळंदीकर यांचा कीर्तन व गोपालकाला कार्यक्रम संपन्न होणार असून गोपालकाला प्रसंगी आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी, सर्वाधिकार लक्ष्मणरावजी गमे, खासदार प्रतिभाताई धानोरकर,हंसराजभैय्या अहिर माजी केंद्रिय राज्यमंत्री तसेच सेवकरामजी मिलमिले यांचे मार्गदर्शन होईल.याप्रसंगी मंडळाची दिवंगत कार्यकर्त्यांना श्रद्धांजली तसेच सेवा गौरव पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी सात वाजता राष्ट्रसंत व्याख्यानमाला व त्यानंतर राष्ट्रसंत विचार चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण होईल , रात्रौ ८.०० वाजता संमोहन कार्यक्रम नवनाथ गायकवाड पुणे यांचा मनोविज्ञानावर आधारित मनोरंजनातून समाज प्रबोधनाचा कार्यक्रम होईल.संपूर्ण कार्यक्रम प्रसंगी श्री गुरुदेव जिजाऊ महिला भजन मंडळ चंद्रपूर साईनाथ भजन मंडळ भद्रावती व संत कृपा भजन मंडळ भद्रावती यांच्या भजनाचा कार्यक्रम होईल.या सर्व कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री गुरुदेव सेवा मंडळ भद्रावतीचे वतीने करण्यात आलेले आहे.

## दत्तक प्रक्रियेकरीता संपर्क करा-महिला व बालविकास कार्यालयाचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ज्यांना नैसर्गिक पालकत्वापासून वंचित राहावे लागते, अशा नागरिकांसाठी आता शासनाने सुवर्ण संधी उपलब्ध करून दिली आहे. पालकत्व मिळण्याकरीता तीन प्रकारे पालक बनण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली असून अधिक माहितीकरीता जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय अंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्षाला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अशी आहे प्रक्रिया.

१) अनाथ बालक दत्तक घेणे : यामध्ये अनाथ, परित्याग केलेले आणि सोडून दिलेल्या बालकांचा समावेश होतो. अशा बालकाचे संरक्षण, जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि चाइल्ड हेल्पलाईनच्या माध्यमातून केले जाते. अशा बालकाचे संरक्षण, पालन पोषणकरिता किलबिल दत्तक योजना संस्था कार्यरत असून बालकल्याण समिती, चंद्रपूर, यांच्या आदेशाने दाखल करण्यात येते. यानंतर सदर बालकांना, बालकल्याण समिती चंद्रपूर द्वारे दत्तक मुक्त केले जाते. दत्तक इच्छुक पालक CARA (Central Adoption Resource Authority) cara.wcd.gov.in या संकेत स्थळावर जाऊन पोर्टलवर नोंदणी करून बालक दत्तक घेऊ शकतात.

२) नात्याअंतर्गत (रक्तातील नाती )/सावत्र दत्तक : बाल न्याय बालकांची काळजी आणि संरक्षण अधिनियम २०१५ चे कलम २(५२) नुसार दत्तक जाणाऱ्या मुलाचे काका- काकू, मामा- मामी, मावसा - मावशी, आजी - आजोबा (आईकडील / वडीलांकडील) हे नात्यांतर्गत दत्तक घेण्यास पात्र असतात. सावत्र दत्तक यामध्ये पती/ पत्नीमध्ये घटस्फोट झाल्यास, तसेच पती /पत्नी यापैकी एकाचे मृत्यू झाल्यास, सदर व्यक्ती दुसरे लग्न करत असल्यास व त्याचे मुल/ मुली असतील, त्या मुलांना लग्न झालेल्या व्यक्तीचे नाव जोडण्याकरीता सावत्र दत्तक केल्या जाते. अशा दत्तक इच्छुक पालकांनी उ-ठ- (Central Adoption Resource Authority) यांचे लरीर्‌ु.लव.सीें.ळप या संकेत स्थळावर जाऊन लरीर पोर्टलवर नोंदणी करून बालक दत्तक घेऊ शकतात.

३) प्रतिपालकत्व दत्तक घेणे : काळजी आणि संरक्षणाची गरज असणारी बालके बालकल्याण समिती चंद्रपुर यांच्या आदेशान्वये बालगृहात दाखल होतात. अशा बालकांना त्यांचे पालक बालकांचे पालन पोषण करण्यास असमर्थ ठरविले जाते. किंवा बालकांना ६ महिन्यापासून भेटायला आले नाही, अशा बालकांना बाल कल्याण समिती द्वारे प्रतिपालकत्व तत्वावर पालन पोषण करण्यास असमर्थ ठरविले जाते. किंवा इच्छुक पालकांना बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी व कुटुंबाचे प्रेम मिळण्यासाठी दत्तक देण्यास येते. यासाठी इच्छुक पालकांनी https:// fcdcommpune. com/ admin या संकेत स्थळावर जाऊन नोंदणी करावी.

यानंतर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती SFC-C (Sponcership and Fostercare ApprovalCommittee) द्वारे पात्र ठरविल्यानंतर बालकल्याण समिती मार्फत बालकाचा ताबा दोन वर्षकरीता पालन पोषण करण्यासाठी पात्र कुटुंबाकडे देण्यात येतो. बालकाचे नाव / आडनाव बदलण्याचा अधिकार पात्र कुटुंबाला राहत नाही व दोन वर्षानंतर बालक जर त्या कुटुंबात रुळले तर अशा बालकाला दत्तक घेण्याची प्रक्रिया पालक कोर्टामार्फत करु शकतो.

दत्तक प्रक्रिया जाणून घेणे व दत्तक प्रक्रियेकरिता नोंदणी विषयी जाणून घेण्याकरीता जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय अंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्षाला भेट देण्याचे आवाहन जिल्हा महिला व बालाविकास अधिकारी दीपक बानाईत आणि जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय साखरकर यांनी केले आहे.

## एकलव्य मॉडेल रेसिडेंशिअल स्कूल प्रवेशाकरीता स्पर्धा परीक्षेचे आयोजन

### २५ जानेवारीपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात एकलव्य मॉडेल रेसिडेंशिअल स्कुल, देवाडा मध्ये इयत्ता ६ वी, ७ वी व ९ वी च्या वर्गातील अनुशेष भरून काढण्याकरीता सद्यस्थितीत ५ वी, तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या व पालकांचे उत्पन्न ६ लक्ष रुपयांपेक्षा कमी असलेल्या अनुसुचित जमातीचे / आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी २३ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत तसेच इयत्ता ६ वी, इयत्ता ७ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांकरीता ११ ते २ या वेळेत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पातील एकलव्य मॉडेल रेसिडिंशिअल स्कूल, देवाडा ता. राजुरा येथे स्पर्धा परिक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे.

तरी सदर प्रवेशपूर्व स्पर्धा परिक्षेकरिता विहित अर्जाचा नमुना एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सिव्हिल लाईन, जिल्हा क्रिडा संकुलाच्या मागे, चंद्रपूर येथे व या प्रकल्पांतर्गत कार्यरत असलेले सर्व शासकीय आश्रमशाळा व शासकीय आदिवासी मुला/ मुलींचे वसतीगृह येथून प्राप्त करून घ्यावे. तसेच अद्यावत माहिती भरलेले विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रतिसोबत वरिलप्रमाणे नमुद ठिकाणी २५ जानेवारी २०२५ पर्यंत सादर करावे. नमुद दिनांकानंतर अर्ज स्विकारले जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी, असे प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांनी कळविले आहे.

# बीड जिल्हा भावसार समाजाच्या जिल्हा अध्यक्षपदी प्रकाश कानगांवकर यांची निवड

## कार्याध्यक्ष गोपाळ कंकाळ तर सचिवपदी अनिल सुत्रे, कोषाध्यक्षपदी कल्याण पतंगे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा भावसार समाजाची महत्त्व पुर्ण बैठक नुकतीच श्री क्षेत्र परळी वैजनाथ येथे बीड जिल्हा भावसार समाजाच्या कार्यकारिणी संदर्भात आयोजित करण्यात आली होती. यामध्ये बीड येथील सामाजिक कार्यकर्ते सर्व सामान्य माणसाच्या सुखदुःखात सहभागी होणारे खर्या अर्थाने या पदाला न्याय देणारे प्रकाशराव कानगावकर यांची एकमताने बीड जिल्हा भावसार समाजाच्या जिल्हाध्यक्षपदी पुन्हा एकदा एकमताने निवड करण्यात आली आहे. तसेच परळी येथील गोपाळ कंकाळ यांची कार्याध्यक्ष पदी तर सचिवपदी अनिल सुत्रे, कोषाध्यक्षपदी कल्याण पतंगे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीनंतर जिल्हाभरा सह राज्य भरातुन समाज बांधवांनी अभिनंदन करत पुढिल कार्यास शुभेच्छा दिल्या.



कार्यकारिणी निवडी नंतर झालेल्या सत्कार समारंभारत उत्तर देताना नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष प्रकाश कानगावकर यांनी सांगितले की, या पुढे समाजातील सर्व सामान्य माणसाला सोबत घेऊन समाजा समोरील असेलेल्या अडचणी या मध्ये प्रामुख्याने समाजातील मुला, मुलीचे विवाह, संबंधित अडचणी या साठी जिल्हास्तरीय वधू वर परिचय मेळावा आयोजित करणे, समाजातील प्रत्येक घटकाचे आर्थिक स्तर उंचविण्यासाठी शासान स्तरावर संत जनाबाई भावसार समाज आर्थिक विकास महामंडळ स्थापना संदर्भात पाठपुरावा करणे, विद्यार्थ्यांना वस्तीगृह तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावे, युवकांना उद्योग-व्यवसायासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील रहाणार आहे, महिला-भगिनींसाठी देखील शासनाच्या विविध योजना व बचत गटाच्या



माध्यमातून त्यांचा आर्थिक स्तर उंचाविण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तसेच जिल्ह्यातील भावसार समाजाची जनगणना करणार असल्याचेही नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांनी सांगितले. तर नवनिर्वाचित कार्याध्यक्ष गोपाळ कंकाळ, सचिव अनिल सुत्रे, कोषाध्यक्ष कल्याण पतंगे, यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की समाजातील बेरोजगार युवकांना मुख्य प्रवाहात सहभागी करून त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करुन समाजातील युवक कसा उभा राहिल यासाठी नक्कीच प्रयत्न करु. दरम्यान उर्वरित कार्यकारिणी लवकरच जाहीर करु असे नवनिर्वाचित अध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांनी सांगितले. यावेळी झालेल्या बैठकीस ज्येष्ठ मार्गदर्शक भालचंद्र तांदळे, गोपाळराव तांदळे, बंडु गरुड, सुधर्मा सदरे, श्रीराम गुंडाळे, भाकरे, सदरे, बीड भावसार समाजाचे अध्यक्ष कैलास रंगदळ, वडवणी भावसार समाजाचे महेश सदरे, विक्रम गार्डी, मंगेश गार्डी, गोविंद सुत्रावे, भगवान पतंगे, विनोद बारटक्के, माजलगाव भावसार समाजाचे अध्यक्ष प्रदीप भावसार, सतीष गरुड, श्रीराम कळसकर, परळी भावसार समाजाचे अध्यक्ष प्रभाकरराव हजारे, उपाध्यक्ष विष्णु क्षीरसागर, युवा अध्यक्ष विलास सुत्रावे, अंबाजोगाई भावसार समाजाचे अध्यक्ष मणिष सुत्रावे, विनोद घाटे, किशोर काकडे, संतोष खेडकर, बुलबुले, बोंडगे, लखन फटाले यांच्यासह भावसार समाजाचे बीड, वडवणी, माजलगाव, परळी, अंबाजोगाई येथील अध्यक्ष, उप अध्यक्ष, सचिव सह सर्व युवक कार्यकारिणी, समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्डिले अन् तनपुरे समर्थकांमध्ये धुमश्चक्री;गोळीबार,चौघे जखमी

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राहुरी विधानसभा मतदारसंघात भाजपचे शिवाजी कर्डिले आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्राजक्त तनपुरे यांच्यात चुरशीची लढत झाली. या लढतीत भाजपचे कर्डिले यांचा विजय झाला.

याच विजयाच्या जल्लोषातून राहुरीतील गुंजाळे गावात धुमश्चक्री झाली.

या हाणामाऱ्यांमध्ये गोळीबार झाला. तसेच एकमेकांविरोधात कुऱ्हाडी चालवण्यात आल्या. राहुरी पोलिस ठाण्यात याप्रकरणी परस्परविरोधी गुन्ह्यांची नोंद झाली आहे.

राहुरीतील गुंजाळे गावात भाजपचे कर्डिले समर्थकांकडून तुफान जल्लोष सुरू होता. फटाके फोडले जात होते. यातून राहुरी गुंजाळे गावातील बसस्थानक चौकात कर्डिले-तनपुरे समर्थक असलेले संजय नवले आणि बाबा चेडवाल एकमेकांविरोधात भिडले. यात एका कार्यकर्त्याने गावठी पिस्तुलातून गोळीबार केल्याने भाऊसाहेब नवले यांच्या पायाला गोळी लागली. नवले आणि चेडवाल यांनी हाणामाऱ्यांमध्ये एकमेकांविरोधात कुऱ्हाडीचा वापर केला.

या धुमश्चक्रीत चौघे गंभीर झाले आहेत. राहुरी पोलिसांकडे परस्परविरोधी फिर्यादी दाखल करण्यात आल्या आहेत. संजय शिवाजी नवले, त्याचा भाऊ भाऊसाहेब नवले, बाबा चेडवाल आणि सोन्याबापू चेडवाल जखमी झाले आहे. भाऊसाहेब



नवले याच्या पायाला गोळी लागली आहे. तसेच कुऱ्हाडीने मार लागल्याने काही जण जखमी झाले आहे. या जखमींवर नगर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे.नवले आणि चेडवाल यांच्यात पूर्ववैमनस्य आहे. या दोघांचे कार्यकर्ते एकमेकांविरोधात भिडल्याची माहिती राहुरी पोलिसांना समजताच, पोलिस निरीक्षक संजय ठेंगे, उपनिरीक्षक चारुदत्त खोंडे अतिरीक्त बंदोबस्तासह घटनास्थळी दाखल झाले. तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथक देखील घटनास्थळी दाखल झाले. यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली.

राहुरी विधानसभा मतदारसंघात भाजपचे शिवाजी कर्डिले आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्यात अटीतटीची लढत झाली. या लढतीत भाजपचे शिवाजी कर्डिले आमदार झाले. कर्डिले यांनी गेल्या पंचवार्षिकच्या पराभवाचा वचपा घेतला.

# महाशिवपुराण कथेच्या दुसऱ्या दिवशी शिवभक्तांचा जनसागर उसळला

**गंगापूर । प्रतिनिधी**

महाशिवपुराण कथेच्या दुसऱ्या दिवशी पंडित राघवजी मिश्रा यांनी शिवभक्तांना उपदेश करताना सांगितले की, ज्या ठिकाणी भगवान शिवशंकर असतात, त्याठिकाणी ३३ कोटी देवीदेवता विराजमान असतात. त्यांनी शिवमहापुराण कथा श्रवण करण्याचे महत्त्व सांगितले, कारण महाशिवपुराण कथा ज्या पावन भूमीवर सुरू आहे, ती भगवान घृष्णेश्वराच्या पदस्पर्शाने पावन झालेली आहे. येथे साक्षात भागवत शंकर विराजमान आहेत, त्यामुळे ३३ कोटी देवीदेवताही विराजमान आहेत, असे पंडित मिश्रा यांनी यावेळी सांगितले.



कथेच्या याच दिवशी, टाका आश्रमचे स्वामी श्री. श्री विद्या वामदेव तीर्थ, वासुदेव सरस्वती, भरत शास्त्रीजी, प.पू. गजानन बापूजी यांच्यासह आयोजक सोपान नारखेडे व हितेश नारखेडे, तसेच नियोजन समितीचे विशाल शेठ मुंदडा, संतोष महाराज बिरुटे, रतन जानराव, कैलास हिंगमिरे, बाबासाहेब सोमासे पाटील, संतोष पाटील साखळे, संतोष कर्नावट, गुलाब वाघ, रामकृष्ण हाडके, विजय डोके, गोविंद मुंदडा यांसारख्या अनेक शिवभक्तांचा उपस्थिती होती.

महाशिवपुराण कथेला दुसऱ्या दिवशी अंदाजे दहा हजार शिवभक्तांची उपस्थिती होती, ज्यामुळे शिव ही सत्य आहे याची प्रचिती शिवभक्तांना अनुभवता आली. २९ आणि ३० नोव्हेंबरला पंडित राघवजी मिश्रा या महाशिवपुराण कथेच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार असून, शिवभक्तांना त्यांच्या गुरुदर्शनाचा लाभ घेता येईल.

# बोगस खतसाठा जप्त,कृषी विभागाची धडक कारवाई

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यातील पाराळा गावामध्ये महादेव ॲग्रो सर्विसेस कृषी सेवा केंद्रावर कृषी विभागाने धाड टाकत मोठ्या प्रमाणात बोगस खतांचा साठा जप्त केला आहे. या प्रकरणात कृषी सेवा केंद्राचे मालक आकाश सोमनाथ जगताप (रा. पारोळा) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पाराळा येथील एका शेतकऱ्याने कृषी विभागाकडे महादेव ॲग्रो सर्विसेस केंद्रातून बोगस खताची विक्री होत असल्याची तक्रार केली होती. तक्रारीनुसार खत निरीक्षक आणि पंचायत समितीचे कृषी अधिकारी जगदीप ज्ञानबा वाघमारे यांनी खत उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींना सोबत घेऊन महादेव ॲग्रो सर्विसेसवर छापा टाकला.कारवाईत गोडाऊनमधून विविध खतांच्या ५५ गोण्या, ज्यांची किंमत ९१,८९० रुपये आहे, जप्त करण्यात आल्या. याप्रकरणी वाघमारे यांनी शिऊर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे.सध्या या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक चेतन ओगळे करत आहेत. बोगस खतसाठ्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जात असून, कृषी विभागाच्या या कारवाईचे परिसरात कौतुक होत आहे.

# श्री.चक्रपाणी प्रभू जन्मोत्सवाच्या समारोपीय कार्यक्रमात आरोग्यदूत परमेश्वर मडावी यांचा सत्कार




**तळोधी (बा.) । प्रतीनीधी**

नागभीड तालुक्यातील नांदेड येथील डोमाजी आधार फाउंडेशनचे संस्थापक,अध्यक्ष आरोग्य दूत परमेश्वर मडावी यांचा गतिमंद,निरासित,निराधार यांच्या करीत असलेल्या सेवेचा गौरव म्हणून त्यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन नुकताच सत्कार करण्यात आला.

नागभीड तालुक्यातील तळोधी (बा.)येथील श्री दत्त मंदिर परिसरात सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी विचार मंच व श्रीदत्त मंदिर महानुभाव पंच कमेटी तळोधी (बा.)द्वारा आयोजित श्रीकृष्ण चरित्र निरूपण,श्रीदत्त मंदिर शताब्दी महोत्सव,श्री चक्रपाणी प्रभू जन्मोत्सव व राज्यस्तरीय ग्रामस्वछता अभियानाच्या समारोपीय कार्यक्रमात

आरोग्य दूत परमेश्वर मडावी यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल,ट्रॉपी व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. आरोग्यदूत मळावी हे मागील ५ ते ६ वर्षांपासून निरासित, निराधार व गतिमंद लोकांची सेवा करीत आहेत.दरवर्षी शिवजयंतीला नागभीड, चिमूर, सिंदेवाही या तालुक्यात फिरून निरासित,गतिमंद व वेड्सर लोकांची सेवा करण्याचा मोठा कार्यक्रम आयोजित करून ते शिवरायाला अभिवादन करतात. या त्यांच्या गौरवशाली समाजशील कार्याची दखल घेऊन सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी विचार मंच तळोधी (बा.)ने त्यांचा सत्कार करून गौरव केला आहे.अलीकडेच एका दान दात्याकडून नांदेड येथे जमीन दान मिळाल्याने छत्रपती शिवरायांच्या नावाने सदर गतिमंद,निराधार लोकांना राहण्याची सोय व्हावी म्हणून लोकवर्गणीतून अनाथालयाचे निर्माण होत आहे.मात्र आर्थिक अडचण भेडसावत असल्याने कामाची गती थांबलेली आहे.तरी समाजातील श्रीमंत तथा दानवीर वर्गाने या निर्माण कार्यात आर्थिक हातभार लावावा.अशी सर्व स्तरातून मागणी करण्यात आली आहे. मडावी यांच्या या सत्काराबद्दल त्यांचे मित्र मंडळी,आप्त व सर्वच स्थरातून अभिनंदन करण्यात आले आहे.

# राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत संस्कार पोदार लर्न स्कूलचे विद्यार्थी झळकणार

**उमरखेड । प्रतीनीधी**

कराटे क्षेत्रात आपल्या कौशल्याची चमक दाखवत संस्कार पोदार लर्न स्कूल च्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी आपले स्थान मिळवले आहे. जिल्हा क्रीडा संकुल, यवतमाळ येथे झालेल्या विभागस्तरीय कराटे स्पर्धेत सोहम कदम, पियूश देशमुख, आणि प्रथमेश काचगुंडे यांनी जिल्हाचे प्रतिनिधित्व केले होते. त्यातील १४ वर्षे वयोगटातील सोहम कदम व १७ वर्षे वयोगटातील पियूश देशमुख या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत




निवड करण्यात आली.

स्पर्धेत ५० हून अधिक शाळांनी सहभाग घेतला होता. विविध वयोगटांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेत कौशल्य सादर केले. या विद्यार्थ्यांनी कुमीते (सामना) प्रकारांमध्ये प्रभावी प्रदर्शन करून गुणांचे महत्त्वपूर्ण बिंदू मिळवले.राज्यस्तरीय स्पर्धा याच महिन्यात धुळे येथे आयोजित करण्यात येणार आहे. या यशामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून त्यांनी स्पर्धेत आणखी चांगली कामगिरी करण्याचा निर्धार केला. व या यशाचे खरे शिल्पकार कराटे प्रशिक्षक सचिन शिंदे हे असल्याचे मत विद्यार्थ्यांनी त्यावेळी व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशाबद्दल संस्थेचे सर्व माननीय संचालक राजेश देशमुख,अजय क्षीरसागर, निशांत बयास व धिरज बागडे, शाळेचे प्राचार्य डॉ. भैरोबा मुंजाळ, प्रशासकीय अधिकारी मा. अतीश दिघेवार, क्रीडाशिक्षक राहुल राठोड व भावेश पटेल, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विजेत्यांचे अभिनंदन करत त्यांना आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. पालकांनीही आपल्या मुलांच्या यशाचा आनंद व्यक्त केला आहे.

# सातवी पास सुरेश धसला मंत्री करण्यापेक्षा मला करा माझी लायकी विधानपरिषदेपेक्षा मोठी-लक्ष्मण हाके

**मुंबई (वृत्तसंस्था)**-विधानसपरिषद नको, माझी लायकी त्याहून मोठी आहे. मला राज्यात गृहमंत्री, अर्थमंत्री किंवा शिक्षणमंत्री करा. त्या सातवी-आठवी पास असलेल्या सुरेश धसला जर तुम्ही मंत्री करणार असाल तर त्यापेक्षा मला करा, असे विधान ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केले आहे. तसेच ओबीसींचे प्रश्न सोडवण्यासाठी मला जे माध्यम मिळेल ते घेईन, असे सूचक विधान देखील हाके यांनी केले आहे.

लक्ष्मण हाके म्हणाले, राज्यात ओबीसी असलेल्या अर्ध्या लोकांचे मी नेतृत्व करतो, त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी मला जे माध्यम मिळेल ते घेईन. सातवी-आठवी पास असलेल्या सुरेश धसला जर तुम्ही मंत्री करणार असाल तर त्यापेक्षा मला करा. माझी लायकी जास्त आहे, ज्ञान जास्त आहे. ओबीसी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी जे काही करावे लागेल ते मी करणार.पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, ओबीसींनी त्यांचा प्रभाव दाखवला आहे. निवडणुकीच्या निकालाच्या आगोदरच सांगितलं होता की दुप्पट हरियाणा पॅटर्न असेल. माझ्यामुळे अनेक उमेदवार आले आणि अनेकजण पडले. जरांगे, टोपे, शरद पवार हे हवेत होते, त्यांचा करेक्ट कार्यक्रम केला. राजेश टोपे यांची २५ वर्षांची सत्ता ही २५०० मतांनी घालवली. रोहित पवारांचे कान कापून विजय साजरा केला, असे लक्ष्मण हाके म्हणाले.मनोज जरांगे यांच्यावर टीका करताना लक्ष्मण हाके म्हणाले, आम्ही ९ ठिकाणी उमेदवारी घेतली. त्यांनी हजारो मते घेतली. जरांगेसारखी शेपूट घालून पळून गेलो नाही. इतर ठिकाणी आम्ही महायुतीला पाठिंबा दिला असेही लक्ष्मण हाके यांनी यावेळी सांगितले.

मागच्या विधानसभेला धनगर समाजाचा एकच आमदार होता, आता सात आमदार झाले आहेत. तसेच उत्तम जानकर यांना देखील आम्ही निवडून आणले असल्याचा दावाही हाके यांनी केला आहे.लक्ष्मण हाके यांनी मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला देखील नाव न घेता संमती दर्शवली आहे. ज्यांच्या नावाने मते मागितली, ज्यांचा चेहरा या निवडणुकीत वापरला त्यालाच मुख्यमंत्री करा, असेही लक्ष्मण हाके म्हणाले आहेत.

# प्रताप ढाकणेंचे कुठे चुकले गणित मोनिका राजळेंनी अशी साधली हॅटट्रिक

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शेवगाव पाथर्डी मतदार संघातील मतदारांनी आमदार मोनिका राजळे यांना विजयचा कौल देऊन मोठ्या मताने विजय केले. आमदार राजळे यांनी तिसऱ्यांदा विधानसभेची निवडणूक जिंकून विजयाची हॅट्रिक केली आहे. निवडणुकी आखाड्यामध्ये आमदार मोनिका राजळे यांनी जोरदार बँटीग करून विरोधकावर मात केली आहे. निवडणुकीतील विजयाचे सर्व गणिते बदलून अपक्ष उमेदवार माजी आमदार चंद्रशेखर घुले, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे अँड. प्रतापराव ढाकणे यांना धोबपछाड केले. जनशक्तीच्या हर्षदा काकडे यांना हि विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात चितपट केले. संयमी, शांत, मितभाशी, मतदार संघातील विकास कामे व जनसंपर्क याच्या जोरावर तिसऱ्यांदा आमदारकी आपल्याकडे ठेवण्यात त्यांना मोठे यश मिळाले आहे.

शेवगाव पाथर्डी व आधीचा शेवगाव नेवासा या मतदार संघात गेल्या पन्नास वर्षापासुन तिसऱ्यांदा निवडून येण्याचा बहुमान कोणत्याही उमेदवारांना मिळाला नाही. मात्र आमदार मोनिका राजळे या मतदार संघातुन तिसऱ्यांदा निवडून आल्याने त्यांचा विक्रम झाला आहे. त्यांनी केलेली विकास कामे, सोज्वळ व शांत स्वभाव, सतत असणारा संपर्क आणी लाडकी बहीन योजनेचा त्यांना निवडणुकीत फायदा झाला. लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचे सहकार्य ही मोनिकाताईंची जमेची बाजू ठरली आहे.

निवडणुक प्रचार दरम्यान सर्व विरोधकांनी राजळे यांना लक्ष केले होते जातीपातीचे राजकारण, मतविभागणी असा बोभाटा झाला मात्र मतदारांनी त्याला थारा न देत आ.राजळे यांच्यावर विश्वास व्यक्त केला. मतमोजणी चालु होताच शेवगाव तालुक्यातुन अपक्ष उमेदवार माजी आमदार चंद्रशेखर घुले यांनी मतात आघाडी घेतली परंतु त्यांना अपेक्षीत असे मते न मिळाल्याने १३ व्या फेरीपासुन आ.राजळे यांना आघाडी मिळत गेली. शेवगाव शहरातुनही त्यांना सुमारे ३ हजार ८०० मताधिक्य मिळाले. तर ड. प्रताप ढाकणे यांनाही अपेक्षीत मतदान मिळत



गेले नाही त्यामुळे एकविसाव्या फेरी अखेर राजळे २५ हजार ४६७ मतांचे मताधिक्य राहिले आणी त्या ११ हजार ३६७ मतांनी आघाडीवर राहिल्या.

पाथर्डी तालुक्यात भालगाव व टाकळीमानुर गटात ड. प्रताप ढाकणे यांना चांगली मते मिळतील अशी त्यांच्या कार्यकर्त्यांची अपेक्षा होती मात्र या दोन्ही गटात राजळेंना मिळालेली मते लक्षणीय ठरली. राजळे यांचे मताधिक्य जसे वाढत गेले तसा कार्यकर्त्यांनी जल्लोस सुरू केला . राजळे यांच्या विजयानंतर त्यांच्या समर्थकांनी गुलाल उधळीत फटाक्याच्या आतषबाजीत आनंदोत्सव साजरा केला. आमदार राजळे यांना मतदारसंघातील प्रत्येक गावातून मताच्या रूपाने मतदारांनी आशीर्वाद दिला. निवडणुकीत शेवगाव पाथर्डी मतदारसंघात विशेषता पाथर्डी तालुक्यात ज्या पद्धतीने निकालाचा अंदाज वर्तवला गेला तसा फारसा विरोधकांना त्याचा झाला नसून शेवगाव बरोबर पाथर्डी तालुक्याने ही राजळे यांना अपक्ष प्रमाणे ही चांगली मते दिली आहे. ज्या पद्धतीने अनेक तर्क , वितर्क आणि विजयाचे अंदाज बांधले गेले होते ते सर्व अंदाज खोल ठरवत आमदार राजळे यांनी पुन्हा एकदा शेवगाव पाथडी विधानसभा मतदारसंघावर आपला डंका वाजवला आहे.या निवडणुकीसाठी प्रांताधिकारी निवडणुक निर्णय अधिकारी प्रसाद मते यांनी काम पाहिले, शेवगावचे तहसीलदार प्रशांत सांगडे, पाथर्डीचे तहसीलदार उध्वव नाईक यांनी सहकार्य केले. मतदार संघाचे निरीक्षक म्हणुन रणजीता यांनी मार्गदर्शन केले. पोलिस उपअधिक्षक सुनिल पाटील, पोलिस निरीक्षक समाधान नागरे व संतोष मुटकुळे यांनी चोख बंदोबस्त ठेवला.

# काशिनाथ दाते टायपिस्ट ते आमदार होण्यापर्यंतचा प्रेरणादायी राजकीय प्रवास

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीने घवघवीत असे यश संपादन केले व राज्याच्या सत्ता पटलावर परत विराजमान होण्याचा महायुतीचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

ही विधानसभा निवडणूक अनेक अर्थाने खूप वैशिष्ट्यपूर्ण ठरली व यामध्ये अनेक अनपेक्षित असे निकाल देखील लागले.या दृष्टिकोनातून आपण अहिल्यानगर जिल्ह्याचा विचार केला तर या ठिकाणी महायुतीचाच वरचष्मा असल्याचे पाहायला मिळाले. तब्बल बारा विधानसभा मतदारसंघांमधून दहा विधानसभा मतदारसंघावर महायुतीचे उमेदवार या ठिकाणी निवडून आले व यामध्ये पारनेर विधानसभा मतदारसंघ हा देखील अनेक अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण ठरला.पारनेर विधानसभा मतदार संघामधून खासदार निलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके आणि महायुतीचे उमेदवार म्हणून काशिनाथ दाते यांच्यामध्ये सरळ लढत झाली. या लढतीमध्ये काशिनाथ दाते यांनी राणी लंके यांचा १५२६ मतांनी पराभव करत विधानसभेत पोहोचण्याची किमया साध्य केली. काशिनाथ दाते हे जिल्हा परिषदेचे माजी कृषी व बांधकाम समितीचे सभापती होते व जिल्हा परिषद म्हणजेच मिनी मंत्रालय ते विधानसभेपर्यंत पोहोचण्याचा प्रवास त्यांनी पूर्ण केला.

दाते यांचा टायपिस्ट ते आमदार होण्यापर्यंतचा रोमहर्षक व प्रेरणादायी राजकीय प्रवास आमदार काशिनाथ दाते यांचा जर आपण राजकीय प्रवास बघितला तर तो गेल्या ४० वर्षापासून आहे. परंतु अगदी सुरुवात जर बघितली तर ४५ वर्षांपूर्वी ते कन्हेर सारख्या एका छोट्या गावातून पारनेर



या ठिकाणी आले व सुरुवातीला टायपिंग इन्स्टिट्यूटच्या व्यवसायामध्ये उतरले व या व्यवसायाच्या माध्यमातूनच त्यांनी अगोदर समाजकारणाला सुरुवात केली.

परंतु राजकारणाची आवड असल्यामुळे व्यवसाय सांभाळून त्यांनी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना व भाजप या पक्षांच्या माध्यमातून राजकारणात सक्रिय असे काम केले. इतकेच नाहीतर पारनेर विधानसभा मतदारसंघातील चार ते पाच आमदारांना त्यांनी साथ देखील दिली.

मध्यंतरीच्या चाळीस वर्षाच्या राजकारणामध्ये त्यांनी पारनेर तालुक्याच्या समाजकारण व राजकारणामध्ये मोठ्या प्रमाणावर काम केले व आजतागायत ते काम त्यांनी सुरू ठेवले आहे. विशेष म्हणजे त्यांनी दिवंगत बाबासाहेब ठुबे, वसंतराव झावरे, गुलाबराव शेळके यांच्यापासून ते आतापर्यंत माजी आमदार नंदकुमार झावरे, माजी आमदार विजय औटी यांच्याबरोबर देखील काम केले आहे. तसेच राजकीय काम करत असताना जिल्हा परिषदेपासून तर कृषी उत्पन्न बाजार समिती तसेच जिल्हा फेडरेशन, जिल्हा सहकारी बँक, पतसंस्था चळवळ तसेच पंचायत समिती यांच्या माध्यमातून ते राजकारणात सक्रिय राहिले.जेव्हा ते शिवसेनेमध्ये होते तेव्हा जिल्हा परिषदेच्या कृषी व बांधकाम समितीचे सभापती म्हणून विकास कामांकरिता तालुक्याला जास्तीत जास्त निधी देऊन न्याय देण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

या सगळ्या राजकीय कारकीर्दीत महायुतीची उमेदवारी त्यांना यावेळी मिळाली. विशेष म्हणजे सगळ्याच पक्षांशी असलेले मित्रत्व व जिव्हाळ्याचे संबंध त्यांना या निवडणुकीत फायद्याचे ठरले. अशा पद्धतीने काशिनाथ दाते यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीत सातत्य ठेवत आज एक टायपिस्ट ते आमदार होण्यापर्यंतचा प्रवास पूर्ण केला.

## शेतकऱ्यांची मजुरांसाठी भटकंती

# धानपिक कापणी,बांधणीला मजूरच मिळेना?

**मुल । रोहित कामडे**

तालुक्यात धान पिकाची कापणी आणि बांधणी सुरू आहे, परंतु मजुरांची मोठी कमतरता जाणवत आहे. यामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांची मजुरांसाठी भटकंती सुरू झाली आहे.

तालुक्यात परंपरेने मुख्य पीक म्हणून धान घेतले जाते. पूर्वी, शेतकऱ्यांना ठोकळ व दीर्घकालीन धानाची लागवड करणे हवे होते. मात्र बाजारपेठेत धानाला कमी भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. परिणामी, शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली नाही आणि उत्पादन करूनही त्यांना योग्य किंमत मिळत नव्हती.

त्यानंतर सुधारणा झाली आणि एचएमटी, परभणी, श्रीराम यासारख्या बारीक धानाच्या



वाणांची लागवड सुरू झाली. आता अनेक शेतकरी बारीक धानाचीच लागवड करतात. शेतकामाच्या हंगामात चार ते पाच महिने ग्रामीण भागातील मजुरांना काम मिळायचं, पण आजकाल काम करणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. धान कापणी आणि बांधणी सुरू असताना, मजुरांची कमतरता असल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात भटकंती करावी लागत आहे. यंत्राचा वापर वाढल्याने, तसेच तरुण पिढी शिक्षणात गुंतल्यामुळे शेतात काम करणाऱ्यांची संख्या घटली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतकाम कसे करायचे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# धानोरे सोनगाव सात्रळ पंचक्रोशीत भाजपचा जल्लोष

**राहुरी । प्रतिनिधी**

विधानसभा मतदारसंघातून भाजपा महायुतीचे उमेदवार शिवाजीराव कर्डीले विजय झाल्याबद्दल राहुरी पाथर्डी नगर मतदार संघात ठीक ठिकाणी शनिवारी संध्याकाळी मोठा जल्लोष पाहायला मिळाला राहुरी मतमोजणी केंद्रावर दिवसभर निकाल आल्यानंतर सायंकाळी दाखल झालेले शिवाजीराव कर्डिले समर्थक व भाजपा महायुतीचे कार्यकर्ते व हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी लाल व भगव्या गुलालाची उधळण करत मोठा जल्लोष करत विजयाचा आनंद व्यक्त केला.

धानोरे सोनगाव सात्रळ कार्यकर्ते व मतदारांच्या वतीने सोनगाव बस स्टॅन्ड ते सात्रळ चौक जुनी बाजारपेठ श्रीराम मंदिर ते धानोरे घाट अशी भव्य मिरवणूक पार पडली. धनेश्वर मंदिरासमोर



विजयी सभा पार पडली.विजय मिरवणूकित कार्यकर्ते , भाजपा बूथ प्रमुख अप्पासाहेब दिघे, रंगनाथ शिंदे, विखे पाटील कारखाना संचालक किरण दिघे उपसरपंच ज्ञानेश्वर दिघे, बाळासाहेब दिघे सुकदेव दिघे, अंबादास दिघे खडूंबाबा दिघे, अमित दिघे निलेश दिघे कौस्तुभ दिघे, अनिल दिघे, बाळासाहेब अंत्रे, रवींद्र दिघे,श्यामराव अंत्रे, निलेश अंत्रे, विनोद अंत्रे, मच्छिन्द्र अंत्रे, पराजी धनवट, संतोष अंत्रे, योगेश गिते, विजय डुक्रे, वसंतराव डुक्रे आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थितीत होते

# बारामतीत फॅमिली ॲग्रीमेंट;राम शिंदेंचा गंभीर आरोप

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

आमदार रोहित पवार व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा



आज यशवंतराव चव्हाण प्रीतीसंगमावर दर्शनाच्या वेळी एक व्हिडिओ व्हायरल झाला. त्यानंतर आमदार राम शिंदे यांनी अजित पवार व रोहित पवार यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. राम शिंदेंच्या प्रचाराला अजित पवार आले नाहीत यावर बोलताना त्यांनी हा बारामतीतील फॅमिली ॲग्रीमेंट असल्याचा आरोप केला आहे.

# संगमनेरचा निकाल अतिशय धक्कादायक-सत्यजित तांबे

**संगमनेर । प्रतिनिधी**

महायुतीने २३६ तर महाविकास आघाडीला केवळ ४९ जागांवर यश मिळाले. विशेष बाब म्हणजे संगमनेर विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांचा या निवडणुकीत धक्कादायक पराभव झाला. महायुतीचे उमेदवार अमोल खताळ यांनी बाळासाहेब थोरात यांचा पराभव केला. या पार्श्वभूमीवर बाळासाहेब थोरात यांचे भाचे नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजीत तांबे यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे.सत्यजित तांबे यावेळी म्हणाले की, संगमनेरचा निकाल धक्कादायक आहे. बाळासाहेब थोरात यांची सभागृहातली कमी निश्चितच सर्व नेत्यांना जाणवल्याशिवाय राहणार नाही.४० वर्ष बाळासाहेब थोरात यांनी सर्वांना सोबत घेऊन काम केलं. ज्यांनी धनुष्यबाणाला मतदान केल असेल ते का केलं असेल ? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला. तसेच संगमनेर



विधानसभा मतदारसंघातील बाळासाहेब थोरात यांच्या पराभवाचे आम्ही आत्मपरीक्षण करू,असे देखील सत्यजीत तांबे यांनी म्हटले आहे.दरम्यान, संगमनेर विधानसभेत प्रचारादरम्यान काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या कन्या जयश्री थोरात यांच्याविषयी सुजय विखे पाटील यांच्या सभेत वसंतराव देशमुख यांनी वादग्रस्त वक्तव्य केले होते. मात्र वसंतराव देशमुख यांनी बेताल वक्तव्य केलेल्या धांदरफळ गावातच महायुतीला मताधिक्य मिळाल्याचे दिसून आले आहे. धांदरफळ बुद्रुक व धांदरफळ खुर्द या दोन्ही गावातून अमोल खताळ यांना २९४५ तर बाळासाहेब थोरात यांना १८४७ मतं मिळाली आहेत.

# आ.सुरेश धस यांचा पुतळा जाळून निषेध

**पाथर्डी । प्रतिनिधी**

आष्टीचे नवनिर्वाचित आमदार सुरेश धस यांच्या पंकजा मुंडे यांच्यावर केलेल्या राजकीय आरोपांमुळे पाथर्डीत त्यांचा जोरदार निषेध करण्यात आला. मुंडे समर्थकांनी शहरातील नाईक चौकात धस यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळून विरोध दर्शवला. राजकीय आरोपांवर प्रतिक्रिया व्यक्त करताना सुरेश धस यांनी आमदार पंकजा मुंडे यांच्यावर विशेष टिप्पणी केली होती, ज्यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये नाराजी पसरली. यावर, मुंडे समर्थकांनी या वर्तमनावर तीव्र निषेध केला आणि याप्रकरणी विरोधाच्या घोषणा दिल्या.निषेधाच्या प्रक्रियेत भाजपचे मुकुंद गर्जे, धनंजय बडे, विजय आव्हाड, नितीन कीर्तने, माऊली



खेडकर, उमेश खेडकर, राहुल खेडकर, हनुमान बडे, शिवनाथ खेडकर, पिणू मंचरे, रामहरी खेडकर, राजू शिरसाट, दिलीप ढाकणे यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# पठार भागावर उपसा जलसिंचन योजना मंजूर : सुजय विखे

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

संगमनेर तालुक्याची विकास प्रक्रिया साध्य करण्यासाठी यापुढे आम्ही सेवक म्हणून काम करणार आहोत. कोणीच साहेब नाही, तर सर्वसामान्य जनताच आमदार आहे. या तालुक्यातील प्रलंबित असणारे अनेक प्रश्न आपल्याला सर्वांना पाच वर्षांमध्ये सोडवायचे आहे. केवळ संगमनेरात नव्हे तर राज्यात परिवर्तन झालेले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री पदाचा शपथविधी झाल्या नंतर मुख्यमंत्र्यांना भेटून पठार भागावर उपसा जलसिंचन योजना मंजूर करून आणण्याची ग्वाही माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.

संगमनेर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या पासून नवनिर्वाचित आमदार अमोल खताळ यांच्या विजयाचा जल्लोष करण्यात आला. त्यानंतर मालपाणी लॉन्स येथे डॉ सुजय विखे यांची सभा आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी ते बोलत होते.

डॉ. विखे म्हणाले की, संगमनेर विधानसभेचा आमदार खताळ नसून आपण सर्व जण असणार सगळ्यांना न्याय मिळणार आहे. कोणीही आमदार म्हणायचे नाही. भाऊ म्हणून हाक मारायची आहे. आरोग्य, पाणी हे सर्व देण्याची जबाबदारी आपली आहे. पुढे जिल्हा परिषद निवडणुका आहे. ही सत्ता सर्व सामान्य माणसांची आहे. प्रत्येक वाडीवस्तीवर आपल्याला पोहोचायचे आहे. जो व्यक्ती



त्याच्या गावात प्रश्न सोडवेल त्याला यापुढे संधी दिली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. संगमनेर तालुक्यातील अनेक वर्षांपासून जे प्रलंबित प्रश्न मार्गी लावायचे आहेत. जनसेवा मंच या ॲपच्या माध्यमातून आपण सर्व प्रश्न सोडवणार आहोत. कोणत्याही नेत्यापुढे अर्ज घेवून फिरावे लागणार नाही. आता अनेक लोक आपल्याला दबावात घेण्याचा प्रयत्न करतील पण आता घाबरायचे कारण नाही. गोरगरीब जनतेचा आवाज आता या ठिकाणी ऐकला जाणार आहे. कोणाला धमकवणे, अपशब्द वापरणे हे आपल्या करायचे नाही. आता आपल्या आत्मसन्मानाने काम करायचे आहे. चाळीस वर्षाचा राग तुम्ही सर्वसामान्यांनी मतपेटीतून दाखवला आहे. आपली वाहने जाळली, लोकांना मारले पण आता आपल्याला विकासाचे राजकारण करायचे आहे. तळेगाव, पठार भागाचा पाणी प्रश्न सोडवायचा आहे. आपल्या मनातील राग शांत करून आता आपल्याला विकास करून दाखवायचा आहे, असे त्यांनी सांगितले.

नवनिर्वाचित आमदार अमोल खताळ म्हणाले की, जनसेवेचा घेतल्याने आज माझ्या सारख्या सर्व सामान्य माणसावर जनतेने विश्वास टाकला त्यामुळे मी आज निवडून आलो. ६०० कोटी रुपयांची विकास कामे महायुती सरकारने केली आहे. ज्यांना ४० वर्षांत पाणी प्रश्न सोडवता आला नाही. त्याची दहशत वाढली होती. मात्र, ही दहशत मोडण्याचे काम आपण सर्वांनी केले आहे. हा विजय लाडक्या बहिणी, शेतकरी यांच्यामुळे झाला आहे. राधाकृष्ण विखे पाटील व डॉ. सुजय विखे पाटील यांच्या माध्यमातून कामे करायची आहे. पाणी आणि रोजगाराचा प्रश्न सोडवणार आहे. माझ्या बरोबर दिवस रात्र सर्वसामान्य माणसांनी काम केले ते कधीही विसरू शकणार नाही. भविष्यात संगमनेर तालुका विकासाभिमुख आणि भयमुक्त करायचा आहे, असे त्यांनी सांगितले.

# भाजपच्या मोनिका राजळे व शिवाजी कर्डिलेंची देखील मंत्रिमंडळात वर्णी लागण्याची शक्यता

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात महायुतीला सर्वाधिक दहा जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे राज्य मंत्रिमंडळात राधाकृष्ण विखे पाटील यांचे मंत्रिपद निश्चित मानले जात आहे. तिसर्यांदा निवडून आलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे संग्राम जगताप, भाजपच्या मोनिका राजळे व शिवाजी कर्डिले यांची देखील मंत्रिमंडळात वर्णी लागण्याची शक्यता आहे.

राज्यात महायुतीला दणदणीत यश मिळाले आहे. त्यामुळे लवकरच राज्यात महायुतीचे सरकार स्थापन होणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात देखील १२ जागांपैकी १० जागांवर महायुतीला यश मिळाले आहे. त भाजपचे राधाकृष्ण विखे पाटील, शिवाजी कर्डिले, मोनिका राजळे व विक्रम पाचपुते असे चार उमेदवार विजयी झाले आहेत. या चार उमेदवारांपैकी राधाकृष्ण विखे पाटील यांना मंत्रिपद मिळण्यात जमा आहे.

उर्वरित तीन उमेदवारांपैकी राजळे या महिला असून, सलग तीनवेळा आमदार झाल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कर्डिले हे माजी मंत्री असून, २०१९ मध्ये त्यांचा पराभव झाला होता. सध्या ते जिल्हा बँकेचे चेअरमन देखील आहेत. तसेच त्यांचा अहिल्यानगर जिल्ह्याचा गाढा अभ्यास असल्यामुळे त्यामुळे कर्डिले यांच्या नावाला अधिक पसंती मिळण्याची शक्यता आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसचे संग्राम जगताप यांनी हॅट्रिक केली आहे. या पक्षाचे आशुतोष काळे व डॉ. किरण लहामटे दुसर्यांदा तर काशिनाथ दाते हे पहिल्यांदाच निवडून आले आहेत. संग्राम जगताप हे ज्येष्ठ सदस्य आहेत. एकनाथ शिंदे यांच्या गेल्या मंत्रिमंडळात देखील त्यांच्या नावाची चर्चा होती. त्यामुळे मंत्रिपदासाठी राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने संग्राम जगताप यांच्याच नावाला पसंती मिळण्याची शक्यता अधिक आहे.

जिल्ह्यात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे संगमनेर मतदारसंघातून अमोल खताळ व नेवासा मतदारसंघातून विठ्ठलराव लंघे विजयी झाले. हे दोन्ही आमदार निवडणुकीपूर्वी भाजपमध्ये होते. संगमनेर व नेवासा या दोन्ही जागा शिवसेनेच्या वाट्याला आल्या होत्या. परंतु उमेदवारच उपलब्ध नसल्याने राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सहमतीने खताळ व लंघे यांना शिवसेनेची उमेदवारी मिळाली आहे. या दोन्ही जागी हे उमेदवार निवडून आले आहेत. हे दोन्ही आमदार पहिल्यांदाच विधानसभेत निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांचा मंत्रिपदासाठी विचार होण्याची शक्यता धूसर आहे.आगामी महायुतीच्या मंत्रिमंडळात राधाकृष्ण विखे पाटील, मोनिका राजळे किंवा शिवाजी कर्डिले तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे संग्राम जगताप या तीन जणांची मंत्रिमंडळात वर्णी लागण्याची शक्यता आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .